दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४८९ वा ● बुधवार, ता. ०७ जानेवारी २०२६ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## शिंदेसेना बाजूला, भाजपची काँग्रेससोबत युती

### अंबरनाथ नगरपरिषदेत राजकीय उलथापालथ

**अंबरनाथ । रयत समाचार**

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेत राज्याच्या राजकारणात खळबळ उडवणारी मोठी घडामोड समोर आली आहे. शिवसेना (शिंदे गट)ला बाजूला ठेवत भाजपने थेट काँग्रेससोबत युती केल्याने महायुतीतील अंतर्गत संघर्ष उघड झाला असून, मुंबईच्या वेशीवर ही देशातील महत्त्वाच्या राजकीय घडामोडींपैकी एक मानली जात आहे. अंबरनाथ नगरपरिषदेत भाजपचे १६, काँग्रेसचे १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे ४ असे एकूण ३२ नगरसेवक एकत्र आल्याने भाजप बहुमतात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर भाजपच्या तेजश्री करंजुले या नगराध्यक्षपदी विजयी झाल्या आहेत. या घडामोडीवर शिवसेना (शिंदे गट) कडून तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे. 'काँग्रेसमुक्त भारत'चा नारा देणाऱ्या भाजपने काँग्रेससोबत हातमिळवणी करून शिवसेनेचा घात केल्याची टीका शिंदे गटाचे आमदार बालाजी किणीकर यांनी केली. ही युती म्हणजे 'अभद्र युती' असल्याचा टोला लगावत, हा निर्णय शिंदे गटाच्या चांगलाच जिव्हारी लागल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, भाजपकडूनही यावर प्रत्युत्तर देण्यात आले आहे. भाजपचे उपाध्यक्ष गुलाबराव करंजुले पाटील म्हणाले की, गेल्या पंचवीस वर्षांपासून भ्रष्टाचार केलेल्या शिंदे गटासोबत सत्तेत बसलो असतो, तर तीच खरी अभद्र युती ठरली असती. अंबरनाथ नगरपरिषदेबाबत महायुतीच्या माध्यमातून शिंदे गटासोबत अनेकदा चर्चा करण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांच्या नेत्यांकडून प्रतिसाद मिळाला नाही, असा दावाही त्यांनी केला. अंबरनाथ नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्षपद भाजपकडे गेले असले, तरी नगरसेवकपदाच्या ५९ जागांपैकी २३ जागांवर विजय मिळवत शिवसेना (शिंदे गट) सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष ठरला आहे. भाजपने १६, काँग्रेसने १२ तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ने ४ जागांवर विजय मिळवला आहे. मात्र सत्तास्थापनेसाठी आवश्यक बहुमतासाठी भाजपने काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत हातमिळवणी केल्याने शिंदे गट सत्तेपासून दूर राहिला आहे. या नव्या राजकीय समीकरणामुळे अंबरनाथसह संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील राजकारण तापले असून, याचे पडसाद राज्याच्या राजकारणातही उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



## काणकोण लोकोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

**काणकोण । प्रभाकर ढगे**

आदर्शग्राम आमोणे पैंगीण येथे आदर्श युवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणारा २५ वा काणकोण लोकोत्सव येत्या ता. ९, १० व ११ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. लोकोत्सवाच्या तयारीने वेग घेतला असून, ती सध्या अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. आदर्श युवा संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्याचे कला व संस्कृती मंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकोत्सवाची तयारी सुरू आहे. यावेळी आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, पत्रकार अजित पैंगीणकर यांच्यासह संघाचे कार्यकर्ते श्रीकांत तवडकर, जानू तवडकर, अर्जुन तवडकर, राजेश वेळीप, रूपेश तवडकर, मधुकर वेळीप, अशोक वेळीप, विशांत गावकर आदी उपस्थित होते. लोकोत्सवासाठी स्पर्धांचे व्यासपीठ सजविणे, क्रीडा मैदान तयार करणे तसेच आदर्श ग्रामातील परिसर सुशोभित करण्याची कामे अंतिम टप्प्यात असून, सुमारे १५० हून अधिक कार्यकर्ते या कामात सक्रिय सहभाग घेत आहेत. गोमंतकीय ग्रामीण लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी काणकोण लोकोत्सव हे प्रभावी व्यासपीठ मानले जाते. दरवर्षी विविध सांस्कृतिक, क्रीडा व पारंपरिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा लोकोत्सव राज्यभरातील रसिकांचे लक्ष वेधून घेतो.

# मागची पानं चाळली तर अजितदादांना बोलता येणार नाही- बावनकुळे

### निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीत आरोप-प्रत्यारोप सुरू



**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी सध्या जोरदार प्रचार सुरू असून, अनेक ठिकाणी सत्ताधारी महायुतीमधील भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आमने-सामने आल्याचे चित्र दिसत आहे. प्रचाराच्या रणधुमाळीत महायुतीतील नेतेच एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत असल्याने राजकीय वर्तुळात वादाची ठिणगी पडल्याची चर्चा सुरू झाली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी भाजपावर टीका करताना, "पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर भ्रष्टाचाराचा कळस गाठला गेला. स्थानिक नेत्यांची राक्षसी भूक दिसून आली," असे वक्तव्य केले होते. या टिकेनंतर भाजपाच्या नेत्यांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही अजित पवारांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना, "७० हजार कोटींच्या प्रकरणाची सुनावणी अद्याप सुरू असून त्याचा निकाल लागलेला नाही.

आम्ही मागची पानं चाळली तर अजितदादांनाही बोलता येणार नाही," असा इशारा दिला. अजित पवार हे प्रगल्भ नेते असून, एका महापालिकेच्या निवडणुकीसाठी महायुतीत मनभेद निर्माण होऊ नयेत, असेही त्यांनी नमूद केले. बावनकुळे पुढे म्हणाले की, "अजितदादांना सल्ला देण्याइतका मी मोठा नाही. मात्र महायुतीत मनभेद व मतभेद निर्माण होईल असे बोलू नये, असे समन्वय बैठकीत ठरले होते. पिंपरी-चिंचवडमध्ये ते अनेक वर्षे सत्तेत होते. आम्ही जर जुनी पाने उलटली तर त्यांनाही फारसे बोलता येणार नाही." महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या आरोप-प्रत्यारोपांमुळे महायुतीतील अंतर्गत तणाव उघडपणे समोर आला असून, याचा निवडणूक प्रचारावर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> **आमचे नेते रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे की, आम्ही सावरकरांचे भक्त आहोत आणि सावरकरांच्या विचारांवर चालतो. त्यामुळे अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला देखील सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील. तुम्ही आमच्यासोबत आलात तर आम्ही सोबत, न आलात तर तुमच्याशिवाय आणि विरोधात गेलात तर तुमच्या विरोधात. आशिष शेलार, भाजप नेते**

## राष्ट्रमाता जिजाऊंच्या आक्षेपार्ह मजकुरावर अखेर ऑक्सफर्डची जाहीर माफी

### दोन दशकांनंतर ऐतिहासिक वादावर अधिकृत पडदा

**पुणे । रयत समाचार**

दोन दशकांपूर्वी महाराष्ट्रात तीव्र वादळ उठवणाऱ्या Shivaji : Hindu King in Islamic India या पुस्तकावरून अखेर ऐतिहासिक निर्णय समोर आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशक असलेल्या Oxford University Press India यांनी राष्ट्रमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या काही असत्यापित व आक्षेपार्ह विधानांबाबत जाहीर माफी मागितली आहे. जेम्स लेन यांनी लिहिलेल्या या पुस्तकात पुण्यातील तथाकथित 'कुजबूज गँग'कडून मिळालेल्या अप्रामाणिक माहितीच्या आधारे इतिहास मांडण्यात आला होता. त्यात राजमाता जिजाऊ माँसाहेबांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणारे उल्लेख करण्यात आल्याचा आरोप झाला होता. या मजकुरामुळे महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली होती, वा.ल. मंजुळ यास शिवप्रेमींनी काळे फासले होते आणि व्यापक वैचारिक घुसळण झाली होती. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाने प्रसिद्ध केलेल्या सार्वजनिक नोटिशीत स्पष्ट केले आहे की, पुस्तकातील काही पानांवरील (३१, ३३, ३४ आणि ९३) विधाने असत्यापित होती. ही विधाने प्रसिद्ध केल्याबद्दल संस्थेने खेद व्यक्त करत, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले तसेच जनतेची जाहीर माफी मागितली आहे. विशेष म्हणजे ही माफी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक सय्यद मंझर खान यांच्या वतीने जाहीर करण्यात आली आहे. दोन दशकांनंतर का होईना, पण महाराष्ट्राच्या ऐतिहासिक अस्मितेला आणि भावनांना दिलेली ही अधिकृत मान्यता महत्त्वाची मानली जात आहे.


PUBLIC NOTICE
Apology to Shrimant Chhatrapati Udayanraje Bhosale
Oxford University Press India published a book titled "Shivaji: Hindu King in Islamic India" in the year 2003. It is hereby acknowledged that some statements regarding Shri Chhatrapati Shivaji Maharaj at page nos. 31, 33, 34 and 93 of the book were unverified.
We sincerely regret publishing those statements. We hereby apologise to Shrimant Chhatrapati Udayanraje Bhosale and the public at large, for any distress and anguish caused to him.
**Oxford University Press India**
**on behalf of its former Managing Director**
**Sayeed Manzar Khan**


## २२७ प्रभागांसाठी १,७०० उमेदवार रिंगणात

### ठाकरेंच्या अस्तित्वाची लढाई सुरू

**मुंबई । रयत समाचार**

देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मुंबई महापालिकेच्या २२७ प्रभागांसाठी ता. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, त्यानंतर ता. १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे.

या निवडणुकीत सुमारे १,७०० उमेदवार आपले राजकीय नशीब आजमावत आहेत. सत्तेसाठी सुरू असलेल्या या लढतीत राजकीय वातावरण तापले असून, प्रत्येक पक्षाने जोरदार तयारी केली आहे. ठाकरे बंधूंच्या एकजुटीमुळे निवडणूक अधिक रंगतदार झाली असून, ही लढत त्यांच्यासाठी अस्तित्वाची मानली जात आहे. दुसरीकडे, भाजप व शिवसेना युतीसाठीही ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली आहे.



सत्ताधारी आणि विरोधकांमधील थेट संघर्षामुळे मुंबईतील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा चर्चेत आली आहेत. विकास, पायाभूत सुविधा, नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसह सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीवर ही निवडणूक होणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. मुंबई महानगरपालिकेवर सत्ता कोणाची येणार, याचा फैसला आता मुंबईतील मतदारच करणार असून, १६ जानेवारी रोजी मुंबईच्या राजकारणाची दिशा स्पष्ट होणार आहे.

## पत्रकार समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य करतात- माजी आ. नंदिहळ्ळी

**बेळगाव । रयत समाचार**

विविध प्रश्नांवर लेखणीद्वारे आवाज उठवणे, सामाजिक कार्याला योग्य न्याय देणे आणि समाजाला योग्य दिशा देण्याचे कार्य पत्रकार अखंडितपणे करत असतात, असे प्रतिपादन माजी आमदार परशुराम नंदिहळ्ळी यांनी केले. आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी पत्रकार दिन साजरा केला जातो. त्या निमित्ताने बेळगाव येथे प्रोत्साह फाउंडेशन व सिद्धार्थ बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात भारती श्रमजीवी पत्रकार संघ (दिल्ली) चे सचिव तसेच बेळगाव मीडिया असोसिएशनचे प्रमुख पत्रकार श्रीकांत काकतीकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रोत्साह फाउंडेशनचे कार्यवाह संतोष होनगल, सिद्धार्थ बोर्डिंगचे संचालक हिरालाल चव्हाण, सुरेंद्र देसाई, संजय चौगुले तसेच उमेश राऊळ उपस्थित होते. यावेळी बोलताना संतोष होनगल म्हणाले की, समाजातील व्यथा-वेदनांना वाचा फोडण्याचे तसेच देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम पत्रकार करतात. देशाच्या जडणघडणीत पत्रकारांची भूमिका महत्त्वाची राहिली असून, शासन व समाजाने पत्रकारांच्या समस्यांचा गांभीर्याने विचार करावा. यावेळी सुरेंद्र देसाई व हिरालाल चव्हाण यांनीही समयोचित विचार व्यक्त करून बेळगावातील सर्व मराठी पत्रकारांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. एस. आर. काळे यांनीही पत्रकार दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या.



## दहशतीच्या जोरावर बिनविरोध निवडणुका; संसदेत आवाज उठविणार- सुप्रिया सुळे

**मुंबई । रयत समाचार**

महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे गट) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या अनेक उमेदवारांची बिनविरोध निवड होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत घडत असलेले प्रकार हे केवळ आपल्यालाच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील जनतेला अस्वस्थ करणारे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सुळे म्हणाल्या की, तब्बल सात ते आठ वर्षांनंतर निवडणुका होत असतानाही मोठ्या प्रमाणावर बिनविरोध निवडणुका होत आहेत. चा पर्याय उपलब्ध असूनही मतदारांचा मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जात आहे.



धमकी, बंदुकीच्या जोरावर दहशत, पैशांचा अतोनात वापर, उमेदवारी अर्ज माघारीसाठी दबाव, ब्लॅकमेलिंग, बोगस मतदान व मतदारांना प्रलोभने देण्याचे प्रकार माध्यमांतून सातत्याने समोर येत आहेत, असा आरोप त्यांनी केला. हे सर्व प्रकार घडत असताना निवडणूक आयोगाचे दुर्लक्ष अधिकच चिंताजनक असून, सुदृढ लोकशाहीसाठी हे अत्यंत धोकादायक असल्याचे सुळे म्हणाल्या. या विषयावर आपण यापूर्वीही संसदेत आवाज उठवला असून, लोकशाहीच्या संरक्षणासाठी पुढेही हे मुद्दे सातत्याने मांडत राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, भाजप व शिवसेना (शिंदे गट) यांच्या उमेदवारांचे महाराष्ट्रातील ६९ पैकी ६८ जागांवर बिनविरोध निवड होणे ही गंभीर बाब असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. पैशाची ताकद व राजकीय दबावावरच निवडणूक निकाल ठरत असल्याचे चित्र निर्माण झाले असून, त्यामुळे निवडणूक व्यवस्थाच संकटात सापडत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## पत्रकारांनी केलेली पत्रकारिता पुस्तकरूपात मांडावी- सुधीर लंके

### मराठी पत्रकार परिषदेकडून पत्रकार दिन साजरा



**अहमदनगर । रयत समाचार**

पत्रकारांनी पत्रकारिता करताना केवळ बातम्या देण्यापुरते मर्यादित न राहता, आपल्या अनुभवांचे व कार्याचे डॉक्युमेंटेशन करणे अत्यावश्यक आहे. पूर्वीचा आणि आजचा बदलता काळ तसेच त्या-त्या काळातील पत्रकारितेचा अनुभव पुस्तकरूपात समाजासमोर मांडावा. अशी पुस्तके नवोदित पत्रकारांसाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरतील, असे प्रतिपादन शासनाच्या अधिस्वीकृती नाशिक विभागाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार सुधीर लंके यांनी केले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने शहरात मराठी पत्रकार दिन पत्रकारांचा सन्मान करून साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. याप्रसंगी मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख, शासनाच्या अधिस्वीकृती नाशिक विभागाचे सदस्य विजयसिंह होलम, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य कोषाध्यक्ष मन्सूर शेख, रामदास ढमाले, महेश देशपांडे, सुदाम देशमुख, शिरीष कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी, रमेश देशपांडे, दिलीप वाघमारे, राजकुमार कटारिया, सुभाष चिंधे, बंडू पवार, सचिन शिंदे, आफताब शेख, राजू खरपुडे, वाजिद शेख, साजिद शेख, बाबा ढाकणे, संजय सावंत, अन्सर सय्यद, गुलाम कादर जहागीरदार, संजय पाठक, राजेंद्र येंडे, सुधीर पवार, जहीर सय्यद, निसार मास्टर, आदिल रियाज शेख, रमीज शेख, नवीद शेख आदींसह पत्रकार, वृत्तछायाचित्रकार व विविध माध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लंके पुढे म्हणाले की, पत्रकारांनी विविध विषयांवर चर्चा व संवादासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत असून डिजिटल मीडियाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. लोकशाही टिकवण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे मोठे व्यासपीठ म्हणून डिजिटल मीडिया समाजासमोर उभे राहिले आहे. त्यामुळे शासनानेही डिजिटल माध्यमांना विश्वासात घेतले पाहिजे. नवोदित पत्रकारांचे योग्य प्रबोधन व प्रशिक्षण दिल्यास ते सक्षम व दर्जेदार पत्रकारिता करू शकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शहरासह जिल्ह्याला पत्रकारितेचा मोठा वारसा लाभलेला असून, सातत्याने विविध सामाजिक, राजकीय व प्रशासकीय घडामोडी येथे घडत असतात. लोकशाहीचे रक्षण करणारा पत्रकारच खरा पत्रकार असतो, असे स्पष्ट करताना लंके यांनी शासनाच्या अधिस्वीकृतीसाठी असलेली नियमावली, त्याचे फायदे व त्याचा लाभ कसा घ्यावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार भूषण देशमुख म्हणाले की, पत्रकारांनी १५० वर्षांपूर्वीचे विषय आणि आजचे विषय यांची सांगड घालून पुढे जाण्याची गरज आहे. पत्रकारितेचा समृद्ध वारसा पुढील पिढीकडे सोपवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. नवोदित पत्रकारांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील योगदानावरही त्यांनी प्रकाश टाकला. विठ्ठल लांडगे यांनी शासनाच्या अधिस्वीकृती नाशिक विभागाचे अध्यक्ष सुधीर लंके व सदस्य विजयसिंह होलम यांच्या कार्याचे कौतुक केले. सर्वसामान्य व ज्येष्ठ पत्रकारांना अधिस्वीकृती मिळवून देण्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने संजय सपकाळ व संजय चोपडा, तसेच फिनिक्स फाउंडेशनच्या वतीने नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांनी पत्रकारांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश देशपांडे यांनी केले, तर आभार आफताब शेख यांनी मानले.



# लोकशाही उत्सव

अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६



## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



राजकारण ही माझ्यासाठी केवळ संधी नाही, तर जबाबदारी आहे. मी गोरख अर्जुन बोरुडे, यावेळी प्रभाग क्रमांक मधून शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी करीत आहे. पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्याला कधीही तडा जाऊ देणार नाही, ही माझी ठाम भूमिका आहे. राजकारणाचा वारसा मला लाभलेला आहे. माझे वडील अर्जुनतात्या बोरुडे हे शिवसेनेकडून नगरसेवक राहिलेले आहेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी सामान्य माणसाशी नातं जपून काम केलं. घरात राजकारण जवळून पाहत मोठा झालो असल्याने लोकांचे प्रश्न, प्रशासनाची कामकाज पद्धती आणि जनतेच्या अपेक्षा मला चांगल्या प्रकारे समजतात. आज मी ज्या प्रभागातून निवडणूक लढवत आहे, तो प्रभाग विस्ताराने मोठा आणि सामाजिकदृष्ट्या विविधतेने नटलेला आहे. या प्रभागात दलित, आदिवासी, भिल्ल वस्ती, हरिजन वस्ती यांसारख्या वंचित घटकांसोबतच उच्चभ्रू वस्तीही आहे. दुर्दैवाने आजवर काही घटक विकासापासून दूर राहिले. ही दरी भरून काढण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न राहील. आरोग्य, शिक्षण आणि शासनाच्या विविध योजना या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, हे माझे प्राधान्य असेल. गरजू नागरिकांना शासकीय सवलती मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे, आरोग्य शिक्षणावर भर देणे आणि तरुणांसाठी संधी निर्माण करणे, या गोष्टी माझ्या कामाच्या केंद्रस्थानी असतील. संपूर्ण प्रभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा माझा मानस आहे. सावेडी गाव, बालिकाश्रम रोड, गंधे मळा, सुडके मळा, बोरुडे मळा, धर्माधिकारी मळा, भिल्ल वस्ती, हरिजन वस्ती, राजवाडा, भुतकरवाडी, झोपडी कॅन्टीन, प्रेमदान, हडकोचा काही भाग असा विस्तीर्ण प्रभाग आहे. प्रत्येक भागाला न्याय देण्याची स्पष्ट विकास ब्लू-प्रिंट माझ्याकडे तयार आहे. फक्त आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीवर माझा विश्वास आहे. प्रभागातील नागरिकांनी मला महानगरपालिकेत जाण्याची संधी दिल्यास, मी प्रभागाचा सर्वांगीण विकास करून हा प्रभाग शहरासाठी एक मॉडेल प्रभाग बनवीन, ही माझी ठाम ग्वाही आहे.

**प्रभाग क्रमांक ७**
**गोरख अर्जुन बोरुडे**
**उमेदवार शिवसेना शिंदे गट**

# विकास, विश्वासामुळेच जनता शिवसेनेसोबत- संजीव भोर

## विशाल गणेश मंदिरातून प्रचाराचा शुभारंभ

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १२ मधील शिवसेनेच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे प्रवक्ते संजीव भोर, महिला जिल्हाध्यक्ष ॲड. स्वाती जाधव, विक्रम राठोड तसेच उमेदवार बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, मंगल लोखंडे, दत्ता कावरे यांच्यासह संभाजी कदम, शिवाजी कदम, चैत्राली बोराटे, आसाराम कावरे, परेश लोखंडे, बाबू कावरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संदेश कार्ले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना संजीव भोर म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्याचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती हे नेहमीच शिवसेनेला पावणारे आहेत. शहराला चार महापौर देण्यामागे



ग्रामदैवताचा आशीर्वाद असून, यंदाही शिवसेनेसोबतच त्यांचा आशीर्वाद आहे. अहिल्यानगरमधील नागरिक नेहमीच शिवसेनेच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातील भरीव विकासकामे, लाडकी बहीण योजना तसेच ज्येष्ठ व वृद्धांसाठी राबविण्यात आलेल्या कल्याणकारी उपक्रमांचा सकारात्मक परिणाम जनतेवर झाला आहे. विकास, विश्वास आणि लोकाभिमुख निर्णयांमुळेच जनता कायम शिवसेनेबरोबर राहिली आहे, असे त्यांनी सांगितले. संभाजी कदम म्हणाले की, स्वर्गीय अनिलभैय्या राठोड यांचे विचार आत्मसात करून शिवसेना नगर शहरात मोठ्या प्रमाणावर विकास करत आहे. शिवसेना नेहमीच एकटी उभी राहून जनतेसाठी लढणारी असून, निवडणुकीत काही उमेदवार कशा पद्धतीने बिनविरोध निवडून आले यामागील वास्तव जनतेने ओळखले आहे. त्यामुळेच सामान्य जनता शिवसेनेच्या पाठीशी अधिक भक्कमपणे उभी आहे. एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांसाठी लढणारे नेते असून, त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात मोठी विकासकामे झाली आहेत. येत्या काळात अहिल्यानगर महानगरपालिकेत शिवसेनेचाच महापौर होईल, असा विश्वास जनतेला आहे. सभेत उमेदवारांनीही विकासाचे मुद्दे मांडले. बाळासाहेब बोराटे यांनी रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतेच्या समस्यांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. सुरेखा कदम यांनी महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य व स्वयंरोजगारासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. मंगल लोखंडे यांनी नालेसफाई, ड्रेनेज व्यवस्था व स्वच्छतेवर भर देण्याचे सांगितले, तर दत्ता कावरे यांनी युवकांसाठी शिक्षण, क्रीडा व रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर लक्ष केंद्रीत केले जाईल, असे स्पष्ट केले.



## तुतारीच्या गर्जनेत महाविकास आघाडीचा प्रचार सुरू

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे उमेदवार प्रचाराच्या मैदानात सक्रिय झाले असून, शहरातील विविध प्रभागांतून प्रचाराला जोरदार सुरुवात करण्यात आली आहे. सावेडी परिसरात ढोल-ताशांचा गजर व तुतारीच्या गर्जनेत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा प्रचार उत्साहात सुरू झाला. सावेडी गावठाण येथील पवनसुत हनुमान मंदिरात नारळ वाढवून प्रभाग क्रमांक ७ मधील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार महेश सखाराम शेळके (अ), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या प्रतिभा अक्षय भगत (क) व योगेश बाबासाहेब सुडके (ड) यांच्या प्रचारार्थ भव्य रॅली काढण्यात आली. या प्रचार रॅलीदरम्यान उमेदवारांनी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांसह घराघरांत जाऊन मतदारांच्या गाठी-भेटी घेतल्या. नागरिकांकडून उमेदवारांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविकास आघाडीला वाढता पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून आले. प्रचारात कार्यकर्ते, समर्थक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवारी नगरमध्ये

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपराष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) युतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गुरुवार, ता. ८ रोजी अहिल्यानगर दौऱ्यावर येत आहेत.

शहरातील मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यालगत असलेल्या पांजरपोळ मैदानात दुपारी १ वाजता त्यांची जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिली. महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस युतीकडून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ही सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेमुळे शहरातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता असून, मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांचे योगदान महत्त्वाचे- जीवने

### निर्भय, निरपेक्ष मतदानाचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

''महानगरपालिका निवडणूक ही लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून, या प्रक्रियेत मतदारांचे योगदान मोलाचे आहे. मनपा स्वीप समितीचे विविध नियोजित उपक्रम निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निश्चितच सहाय्यभूत ठरतील,'' असे प्रतिपादन मुख्य निवडणूक निरीक्षक आदित्य जीवने यांनी केले. महिला व नवमतदारांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली. अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने मनपा स्वीप समितीच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आराखडा व अहवाल मुख्य निवडणूक अधिकारी तथा मनपा आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांच्या माध्यमातून निवडणूक निरीक्षकांना सादर करण्यात आला. मतदारांचे




नियोजनबद्ध शिक्षण व निवडणूक सहभाग वाढविण्यावर आधारित उपक्रमांचा यात समावेश आहे. यावेळी पथकातील अतिरिक्त जिल्हाधिकारी (जळगाव) श्रीमंत हरकर व स्वीप समितीचे सदस्य उपस्थित होते. ''लोकशाहीला समृद्ध करणाऱ्या मतदान प्रक्रियेत नावीन्यपूर्ण उपाययोजना प्रभावी ठरून, निर्भयपणे व निरपेक्ष वृत्तीने मतदान करण्यासाठी मतदारांना प्रोत्साहित करतील,'' असा विश्वास श्रीमंत हरकर यांनी व्यक्त केला. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, स्वीप नोडल अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अशोक साबळे आणि मतदारदूत डॉ. अमोल बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्वीप आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यात मतदार जनजागृतीसाठी रॅली, शोभायात्रा, सेल्फी पॉइंट, पथनाट्य, विविध स्पर्धा, नवमतदार जागृती, दिव्यांग, तृतीयपंथी व वंचित घटकातील महिलांसाठी विशेष उपक्रम, ईव्हीएम व व्हीव्हीपॅटविषयक शिबिरे, मतदार जनजागृती शपथ, संकल्पपत्र, बाईक रॅली, दृकश्राव्य निर्मिती, समाजमाध्यमांचा वापर, 'आयुक्तांशी संवाद', मनपा दौड व हळदीकुंकू कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

## 'आता माझी बारी, आली १५ जानेवारी', मतदार जनजागृतीसाठी रिल्स स्पर्धा

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व महानगरपालिकेचे मुख्य निवडणूक अधिकारी यशवंत डांगे यांच्या संकल्पनेतून अहिल्यानगर मनपा सार्वत्रिक निवडणुकीत १०० टक्के मतदान साध्य करण्यासाठी तसेच मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने ''आता माझी बारी आली १५ जानेवारी'' या विषयावर रिल्स, व्हिडिओ बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन मनपा स्वीप समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




माझे माझ्या शहरावर प्रेम असून मी लोकशाहीचा पाईक आहे. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान करून लोकशाहीतील या महत्त्वपूर्ण दिवसाचा सन्मान करेन,'' या भावनेतून या स्पर्धेचे नाव देण्यात आले असून, विजेत्या स्पर्धकांना भरघोस पारितोषिके दिली जाणार आहेत. स्पर्धे साठी १) उत्सव निवडणुकीचा अभिमान माझ्या शहराचा, २) माझं मत माझा अधिकार आणि ३) ''आपले अहिल्यानगर मनपाचे मतदान १५ जानेवारी २०२६ रोजी आहे जरूर मतदान करा,'' हे तीन विषय देण्यात आले आहेत. ३० सेकंद ते १ मिनिट कालावधीचा रील / व्हिडिओ तयार करणे आवश्यक आहे. रिल्समध्ये कोणत्याही राजकीय व्यक्तीचे नाव, उमेदवाराचे नाव, राजकीय पक्षाचे नाव अथवा निवडणूक चिन्ह असू नये. तसेच आदर्श आचारसंहितेचे पालन करणे बंधनकारक आहे. स्पर्धकांनी रिल्ससोबत स्वतःचे संपूर्ण नाव व पत्ता अहिल्यानगर मनपा स्वीप समितीच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर (८०५५८०९३९४) ता. १५ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावा. मतदार जनजागृतीसाठी रीलप्रेमी व सजग मतदारांनी या स्पर्धेत सहभागी होऊन तयार केलेले रिल्स / व्हिडिओ स्वतः च्या सोशल मीडियावरही शेअर करावेत, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार मुंढे, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, स्वीप नोडल अधिकारी अशोक साबळे, मतदारदूत डॉ. अमोल बागुल, प्रसिद्धी अधिकारी नितीन ब्राह्मणे, प्रशासनाधिकारी जुबेर पठाण व सर्व स्वीप समिती सदस्यांनी केले आहे.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# आ.मोनिका राजळे यांची विरोधकांवर राजकीय कुरघोडी

## महिला सदस्याला गळाला लावत केले मुत्सद्देगिरीचे प्रदर्शन

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी नगर परिषदेच्या गट नोंदणीच्या वेळी पुन्हा एकदा धक्कातंत्राचा अवलंब करत आमदार मोनिका राजळे यांनी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एका महिला सदस्याला गळाला लावून मोठी राजकीय खेळी केली. आपल्या दृश्य-अदृश्य राजकीय विरोधकांवर कुरघोडी करत मुत्सद्देगिरीत आपणच श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले.


जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी भाजपाची गटनोंदणी करण्यात आली. यावेळी, आमदार राजळे यांनी पाथर्डी नगर परिषदेच्या गटनेतेपदी डॉ. शारदा मृत्युंजय गर्जे यांची निवड करत, नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या पायांत खोडा घालताना एकाच दगडात अनेक पक्षी गारद केले. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवडून आलेल्या वंदना सोमनाथ टेके यांना जिल्हाधिकारी कार्यालयात पाचारण करत, जोर का धक्का धीरे से लगे - या, एका विख्यात जाहिरातीच्या स्लोगनची प्रचीती दिली. नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषदेच्या निवडणुकीत एकूण २० पैकी भारतीय जनता पार्टीचे १४, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ५ व अपक्ष १ असे बलाबल आहे. एकूण ७ सदस्यांमागे एक स्वीकृत नगरसेवक निवडण्यात येतो. नगर परिषदेच्या सभागृहातील नगरसेवकांची संख्या २० असल्याने २ सदस्य स्वीकृत म्हणून निवडण्यात येणार आहेत. हे दोन स्वीकृत नगरसेवक निवडताना तौलनीक संख्येच्या विचार करता भाजपाकडे १६ सदस्य असणे गरजेचे होते. परंतु, भाजपाचे एकूण १४ नगरसेवक निवडून आले होते. नगराध्यक्षांचे एक मत, अशी भाजपाची १५ मतांची गोळाबेरीज झाली होती. त्यामुळे, भाजपाला एका मताची आवश्यकता होती.



**कोंडी निर्माण झाल्यावर मांजर जशी जास्तच सावध होऊन बाहेर पडण्याचा मार्ग शोधते, त्याप्रमाणेच विपरीत राजकीय परिस्थिती निर्माण झाल्यावर आमदार मोनिका राजळे यांच्या बुद्धीला विलक्षण धार येते. अशावेळी बाहेरुन शांत भासणाऱ्या आ. राजळे कमालीच्या सक्रिय असतात. त्यांचे दोन्ही राजकीय प्रतिस्पर्धी अनुक्रमे चंद्रशेखर घुले पाटील व ॲड. प्रताप ढाकणे यांना, त्यांनी दोन वेळा चितपट करत त्यांची राजकीय योग्यता सिद्ध केली आहे. आता मात्र वारे उलटे वाहू लागताच त्यांनी चंद्रशेखर घुले पाटील यांच्याशी जवळीक निर्माण करत शेवगावचा तिढा सैल केला आणि पाथर्डी नगर परिषदेत अभय आव्हाड यांना जेरबंद करत विखे पाटील पिता-पुत्रांनाही शह दिला आहे.**

अशा गुंतागुंतीच्या प्रसंगी, आ. मोनिका राजळे यांनी नेहमीप्रमाणे धक्कातंत्राचा अवलंब करत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वंदना टेके यांना गळाला लावून भाजपाच्या गोटात सामील करून घेत दोन्ही स्वीकृत नगरसेवक आपल्या पारड्यात पाडून घेण्याची खेळी यशस्वी केली. त्यामुळे नगर परिषदेच्या कारभाराकडे राजकीय निरीक्षकांसह सामान्य नागरिकांचेही लक्ष लागले आहे. १५ दिवसांपूर्वी नगर परिषदेच्या निवडणुकीचा निकाल लागूनही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची गटनोंदणी न झाल्याचा फायदा भाजपाने उठवला. यामुळे, आ. राजळेंचे अप्रत्यक्षपणे नगर परिषदेवर वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. ॲड. प्रताप ढाकणे यांच्या राजकारणात गांभीर्याचा अभाव असल्याने त्यांना अनेकदा याची किंमत चुकवावी लागली आहे. पाथर्डी व शेवगाव नगर परिषदांवर विखे पाटील पिता-पुत्र समर्थकांची वर्णी लागल्याने सकृतदर्शनी शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघावर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याचे दिसून आले होते. ही अनपेक्षीत कोंडी झाल्याने, आ. राजळे यांनी नुकतीच माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्याशी जवळीक साधून, शेवगावचाही तिढा सैल केला आहे. त्यामुळे, पुन्हा एकदा आमदार मोनिका राजळे यांच्या मुत्सद्दीपणावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त करण्यासाठी आमरण उपोषणाचा इशारा



**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील तिसगाव येथील अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त करावेत तसेच गोवंश व गोमातेची होणारी अवैध कत्तल थांबवावी, या मागणीसाठी तालुक्यातील संत-महंत व गोरक्षकांनी बुधवारी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

गटविकास अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे शहर व तालुक्यात सामाजिक तणावाची परिस्थिती निर्माण झाली असून, पोलीस व तालुका प्रशासन तणावात आहे. यापूर्वीही विविध संत-महंतांनी तिसगावमधील अवैध कत्तलखाने उद्ध्वस्त करण्याच्या मागणीसाठी उपोषण व आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने केलेली जुजबी कारवाई हिंदुत्ववादी संघटनांना मान्य नसल्याचे गोरक्षकांनी स्पष्ट केले. याबाबत चर्चा व विनिमयासाठी प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात तालुका प्रशासनातील अधिकाऱ्यांसोबत गोरक्षकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संपूर्ण कत्तलखाने समूळ उद्ध्वस्त करण्याच्या मागणीवर गोरक्षक ठाम राहिले.. या पार्श्वभूमीवर तालुका प्रशासन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून, पुढील घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकार असल्याचा अभिमानच नव्हे, तर स्वाभिमानही असला पाहिजे- सुनीलगिरी महाराज



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेची भूमिका केवळ बातम्या प्रसिद्ध करण्यापुरती मर्यादित नसून, समाजाला न्याय देणारी, अन्यायाविरोधात आवाज उठवणारी आणि सत्य लोकांपर्यंत पोहोचवणारी आहे. त्यामुळे पत्रकारांनी आपल्या पत्रकारितेचा अभिमान बाळगावा, मात्र सत्य, नीतिमत्ता व निर्भीडतेवर आधारित स्वाभिमानही कायम ठेवावा, असे प्रतिपादन श्रीराम सेवा धाम, मुकिंदपूर (नेवासा) येथील महंत सुनीलगिरी महाराज यांनी केले.

बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच पत्रकार दिनानिमित्त त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान अंतर्गत साहेबरावजी घाडगे पाटील शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा संकुल, ढोरजळगाव यांच्या वतीने आयोजित पत्रकार सत्कार व मार्गदर्शन समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महंत सुनीलगिरी महाराज उपस्थित होते. यावेळी अनंता उकिर्डे, आसाराम उकिर्डे, बापूसाहेब पाटेकर, महादेव पाटेकर, सरपंच गणेश कराड, उद्योजक हसन शेख, सचिन कर्डीले, संजय बुधवंत, प्राचार्य सुनील चोळके, आशिष भारती, शिक्षकवृंद तसेच परिसरातील ग्रामस्थ व तालुक्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनीलगिरी महाराज पुढे म्हणाले की, पत्रकार हा समाजाचा आरसा असतो. आपल्या लेखणीतून समाजातील वास्तव मांडणे, चांगल्या कार्याला प्रसिद्धी देणे आणि चुकीच्या गोष्टींवर बोट ठेवणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे. कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्य मांडणारा पत्रकारच समाजाला योग्य दिशा देऊ शकतो. पत्रकारांनी एकी जपली तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. पत्रकारितेत प्रामाणिकपणा, निर्भीडपणा व सामाजिक बांधिलकी ही त्रिसूत्री असली पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. त्यांनी सुरू केलेली समाजप्रबोधनाची परंपरा आजच्या पत्रकारांनी पुढे नेली पाहिजे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. यावेळी विविध क्षेत्रांत कार्यरत पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन कर्डीले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी परिश्रम घेतले.

दरम्यान, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, शेवगाव येथेही पत्रकार दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्व पत्रकारांना आमंत्रित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य कुंदे सर यांनी पत्रकारांचे स्वागत व सत्कार करून पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. समाजाच्या जडणघडणीत पत्रकारांचे योगदान मोलाचे असून, पत्रकारितेने नेहमीच सत्याची व विवेकाची बाजू घ्यावी, असे त्यांनी सांगितले. पत्रकार दिनानिमित्त आयोजित या दोन्ही कार्यक्रमांतून पत्रकारितेचे सामाजिक महत्त्व अधोरेखित झाले असून, पत्रकारांनी निर्भीडपणे व जबाबदारीने कार्य करण्याचा संदेश देण्यात आला.

# हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धेत शिंदे विद्यालयाची उल्लेखनीय कामगिरी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे पार पडलेल्या पुणे विभागीय शालेय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धेत श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी करत मोठे यश संपादन केले. या स्पर्धेत शर्वरी योगेश टकले, वैष्णवी ज्ञानदेव भागवत, श्रावणी भारत भगाडे आणि वृषाली प्रकाश मोटे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या यशासह त्यांची राज्यस्तरीय शालेय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशामागे ग्रँडमास्टर समीर पांढरकर व ओम पांढरकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदर विद्यार्थिनी श्रीगोंदा पंतनगर कम्युनिटी हॉल येथे नियमित कराटे व बॉक्सिंग प्रशिक्षण घेत असून, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचा त्यांच्या कामगिरीत मोठा फायदा झाला आहे. या यशाबद्दल विद्यार्थिनींचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

# रस्ता दुरुस्तीसाठी संभाजी ब्रिगेडचे आमदारांना साकडे

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सिद्धटेककडे जाणारा श्रीगोंदाटाकळी कडेवळीत हा इंधन व वेळ वाचवणारा मार्ग असून तो अत्यंत जवळचा व महत्त्वाचा रस्ता आहे. मात्र हा मार्ग अनेक वर्षे बंद होता. सन २०१३ पासून हा रस्ता हळूहळू सुरू झाला असून, मार्गावरील तीन नद्यांवरील तसेच घोडकॅनॉल पुलांची कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०१८ मध्ये माजी आमदार बबन पाचपुते यांच्या प्रयत्नातून मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत या रस्त्यासाठी सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र त्यानंतर अनेक वर्षे उलटूनही रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. श्रीगोंदासिद्धटेक हा मार्ग जवळचा असल्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. तसेच हा रस्ता कर्जत तालुक्याच्या दक्षिण भागाकडे, राशीन व भिगवनकडे जाणारा प्रमुख मार्ग असल्याने वाहनांची सतत वर्दळ असते. रस्ता अरुंद असल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. हा रस्ता किमान सात मीटर रुंदीचा काँक्रीट करणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी भिंगान येथील ग्रामस्थांनी वेळोवेळी आंदोलने व उपोषणे केली असून, सामाजिक कार्यकर्ते नाना शिंदे यांनीही वारंवार उपोषण केले आहे. सध्या रस्त्यावरील सर्व पुलांची कामे पूर्ण झालेली असून, आता नवीन रस्ता होणे गरजेचे बनले आहे. या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडच्या वतीने आमदार विक्रम पाचपुते यांना रस्ता दुरुस्तीबाबत पत्र देण्यात आले आहे. ते या रस्त्याचे काम मार्गी लावतील, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.



# अपप्रवृत्तींविरोधात पत्रकाराने बेधडक लिखाण करावे- प्रा. डॉ. सीताराम रौंदळ

**नेवासा । विजय खंडागळे**

लोकमान्य टिळक यांनी मंडालेच्या तुरुंगात असताना 'केसरी' वृत्तपत्र सुरू करून ब्रिटिशांच्या शोषणाविरोधात जनजागृती केली. भारताच्या स्वातंत्र्याचा पाया टिळकांनी रचला, तर त्यावर कळस महात्मा गांधी यांनी रचला.

आज देश भ्रष्टाचार, जातीयवाद व दहशतवादाने पोखरला असून, या अपप्रवृत्तींविरोधात पत्रकाराने निर्भीडपणे लिखाण केल्यास देश अधिक मजबूत होईल. ही जबाबदारी पत्रकारांनी पार पाडावी, असे प्रतिपादन प्रा. डॉ. सीताराम रौंदळ यांनी केले. ते पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पत्रकार विजय खंडागळे यांच्या सन्मानप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जिल्हा उपाध्यक्ष जालिंदर येळवंडे होते. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, लोकांच्या भावना लक्षात घेऊन बेगडी व कालबाह्य श्रद्धांचा पगडा दूर करण्यासाठी पत्रकारांनी कार्य करावे, असे ते म्हणाले. यावेळी माजी मुख्याध्यापक संजय लोंढे, मुळा बँकेचे संचालक रामभाऊ कराळे, सामाजिक कार्यकर्ते उद्धव आव्हाड, नगर आकाशवाणीचे नियमित उद्घोषक संजय वैरागर, लांडेवाडीचे विजय दरंदले, संतोष तेलोरे, कल्याण गडाख, भाऊसाहेब भुसाळ, अरुण शिंदे, फिरोज पठाण, अरुण वैरागर, डॉ. संदीप वीरकर, पाराजी राशिनकर, सटाले, एस. के. सय्यद, नागेबाबा परिवार, मुळा कारखाना व जिल्हा सहकारी बँकेच्या वतीने उपस्थित मान्यवरांनी पत्रकार विजय खंडागळे यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान व शुभेच्छा दिल्या.



# जवाहर विद्यालयात पत्रकार दिन साजरा

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे आद्य पत्रकार व समाजसुधारक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले.

उपप्राचार्य रघुनाथ भोजने यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात चांदा पंचक्रोशीतील पत्रकार देविदास चौरे, अरुण सोनकर, बंडू दहातोंडे, शेखर चौरे, प्रा. रावसाहेब राशिनकर यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच नुकताच पुणे येथील एस. एम. जोशी फाउंडेशन सभागृहात संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय फ ुले फेस्टिव्हल २०२६ चे अध्यक्षपद भूषविल्याबद्दल काव्यरत्न प्रा. रावसाहेब राशिनकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य अंशुमन वाकचौरे, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष किरण जावळे, प्रा. दिलीप ससे, प्रा. संदीप बुचकूल, प्रा. भाऊसाहेब पानसरे, स्वाती दळवी, रुख्मिणी सोनवणे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमप्रसंगी प्रा. भगवान भाबड, पत्रकार अरुण सोनकर व उपप्राचार्य रघुनाथ भोजने यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. कृष्णा शेंडे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रा. भाऊसाहेब तांबे यांनी आभार मानले.



# शैक्षणिक सहलीतून लोकशाहीचे धडे

## श्रीराम विद्यालयाची विधानभवनाला भेट

**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथील श्रीराम विद्यालयाच्या १६५ विद्यार्थ्यांनी नुकतीच शैक्षणिक पर्यटन सहलीअंतर्गत महाराष्ट्र विधान भवन येथे भेट दिली. या सहलीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्था, शासनाची कार्यपद्धती व राज्याच्या प्रशासकीय रचनेची प्रत्यक्ष ओळख करून देणे हा असल्याची माहिती प्राचार्य संभाजी पवार यांनी दिली. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी मंत्रालयालाही भेट दिली. विधान भवनात कायदे कसे बनतात, लोकप्रतिनिधींची भूमिका काय असते आणि प्रशासन कसे चालते याबाबत विद्यार्थ्यांनी सविस्तर माहिती घेतली. प्रत्यक्ष विधान भवन व मंत्रालय पाहताना विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता दिसून आली. या अनुभवामुळे लोकशाही मूल्यांची जाणीव वाढून जबाबदार नागरिक होण्याची प्रेरणा मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. याशिवाय मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राईव्ह, छत्रपती शिवाजी टर्मिनस आदी ऐतिहासिक पर्यटनस्थळांनाही विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या. या शैक्षणिक सहलीत विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद व सहाय्यक कर्मचारी सहभागी झाले होते.

# बेलापूर ग्रामपंचायतकडून १ कोटीची घरपट्टी, पाणीपट्टी वसुली

**बेलापूर । शफीक बागवान**

मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत बेलापूर बु. ग्रामपंचायतीने १ कोटी रु. घरपट्टी व पाणीपट्टी वसुली केली आहे. राज्य शासनाने १३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधित मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत घरपट्टी व पाणीपट्टीच्या थकबाकीत ५० टक्के सवलत देण्याचे जाहिर केले होते. ग्रामपंचायतीने या अभियानाचा प्रभावी प्रचार व प्रसार करुन अभियान घरोघर पोहचवले. तसेच ग्रामस्थांना सदर अभियानाचा लाभ घेण्याबाबत आवाहन केले होते.

सदर आवाहनास ग्रामस्थांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यामुळे अभियान कालावधित ६३लाख २० हजार ७३२ रु.घरपट्टी तर ४६ लाख ११ हजार ७५२ रु.पाणीपट्टी अशी एकुण १ कोटी ९ लाख ३२ हजार ४८४ रुपयांची वसुली झाली. यासाठी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सचिन नगरकर, बाळासाहेब तागड,राजेंद्र भिंगारदिवे सचिन साळुंके,विजय खरोटे आदींनी विशेष परिश्रम घेतले. सदर अभियानास बेलापूर ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला.

# सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी

सुरेश कलमाडी या नावाशिवाय पुण्याचा राजकीय इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. जवळपास तीन दशके पुण्याच्या राजकारणावर एकहाती हुकूमत गाजवणारे पुण्याचे कारभारी असलेले पुण्याचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांचे काल मंगळवार, ६ जानेवारी रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने पुण्यावर एकहाती वर्चस्व गाजवणारा नेता काळाचा पडद्याआड गेला. १ मे १९४४ रोजी जन्मलेले सुरेश कलमाडी यांनी सेंट व्हिन्सेंट हायस्कुलमधून आपले शालेय शिक्षण पूर्ण केले तर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून उच्च शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या नॅशनल डिफेन्स अकॅडमीमध्ये प्रवेश घेऊन पायलट बनण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काही वर्ष भारतीय हवाई दलात पायलट म्हणून सेवा केली. १९६५ आणि १९७१ च्या युद्धात त्यांनी हवाई दलाचे पायलट म्हणून भाग घेतला होता. १९७२ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला. संजय गांधी यांचे ते निकटवर्ती होते त्यांच्यामुळेच ते राजकारणात आले असे म्हटले गेले. काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यावर त्यांना पुण्याचे प्रमुख बनवण्यात आले. त्या काळी पुण्यात अनेक दिग्गज नेते होते मात्र सर्वांना बाजूला सारून त्यांनी पुण्याची धुरा स्वीकारली. ९० च्या दशकात तर पुण्यावर त्यांचे एकहाती वर्चस्व होते.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

१९९१ साली तत्कालीन पंतप्रधान पी व्ही नरसिंहराव यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि रेल्वे राज्यमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. रेल्वे राज्यमंत्री म्हणून त्यांनी रेल्वेचा अर्थसंकल्पही सादर केला होता. केंद्रीय मंत्री आणि पंतप्रधान नरसिंहराव यांचे निकटवर्ती असल्याने पुण्यावर त्यांनी एकहाती वर्चस्व गाजवायला सुरुवात केली. पुण्यात ते काँग्रेसचे सर्वेसर्वा बनले. पुणे महानगर पालिकेवर त्यांचे एकहाती वर्चस्व होते. पुण्याचे नगरसेवक, पुण्याचा महापौर कोण होणार हे कलमाडी ठरवत असे. पुण्याचे आमदार देखील कलमाडींच्याच मर्जीतील असत. पुण्याच्या राजकारणावर त्यांची एकहाती पकड होती म्हणूनच त्यांना पुण्याचे कारभारी असे संबोधले जायचे. त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांची रीघ लागलेली असे. त्यांचे कलमाडी हाऊस कार्यकर्त्यांनी फुलून गेलेले असे. केंद्रीय मंत्री आणि पुण्याचा खासदार या नात्याने त्यांनी पुण्याला जागतिक शहर बनवण्याचा प्रयत्न केला. पुणे मेट्रो प्रकल्प, विमानतळ विकास त्यांच्याच प्रयत्नामुळे साकार झाले. पुण्यात सर्वप्रकारच्या पायाभूत सुविधा असाव्यात असा त्यांचा आग्रह असे. पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आणि पुणे फेस्टिवल सुरू करून त्यांनी पुण्याला जागतिक स्तरावर नेले. १९९१ ते १९९६ या काळात पुणे काँग्रेसचे सर्वेसर्वा असणाऱ्या कलमाडी यांनी १९९७ साली मात्र काँग्रेस सोडली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. पराभवानंतर कलमाडी यांनी शरद पवारांमुळेच आपल्याला पराभव स्वीकारावा लागला असे त्यावेळी जाहीर वक्तव्य केले होते. अपक्ष म्हणून निवडणुकीत उभे राहिलेल्या कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता आणि त्यांच्या प्रचारासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी पुण्यात आले होते. १९९८ साली झालेली राज्यसभा निवडणूक खूप गाजली या निवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत त्यांचे प्रतिस्पर्धी होते राम कदम. कदम हे गांधी कुटुंबाच्या जवळचे होते शिवाय जिंकून येण्याइतपत मते त्यांच्याकडे होते तरीही त्यांना धोबीपछाड देऊन कलमाडी यांनी ती निवडणूक जिंकली आणि राजकारणात भूकंप घडवला होता. या विजयानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी ''सबसे बडा खिलाडी सुरेश कलमाडी'' अशा घोषणा दिल्या होत्या. १९९९ साली काँग्रेस फुटली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली सुरेश कलमाडी पुन्हा काँग्रेसमध्ये परतले. २०१० पासून मात्र त्यांच्या राजकीय कारकीर्दीला उतरती कळा लागली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत गैरव्यवहार केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला. त्यांना काहीकाळ तुरुंगातही रहावे लागले. २०२५ साली ईडीने त्यांच्याविरोधात पुरावे नसल्याने क्लोजर रिपोर्ट दाखल केला न्यायालयानेही तो स्वीकारला पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सुरेश कलमाडी हे राजकीय विजनवासात पोहचले होते. जवळपास तीन दशके पुण्याचे कारभारी राहिलेले सबसे बडे खिलाडी सुरेश कलमाडी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# अहिल्यानगर डाक विभाग उपअधिक्षकपदी- निमसुडकर

**अहमदनगर | रयत समाचार**

अहिल्यानगर डाक विभागाच्या उपअधिक्षकपदी अमेय निमसुडकर यांची नियुक्ती झाली असून, त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते नागपूर डाक विभागात उपअधिक्षक म्हणून कार्यरत होते. अमेय निमसुडकर यांनी सन २००० मध्ये सोलापूर विभागातून 'डाक सहाय्यक' म्हणून सेवेला सुरुवात केली. सोलापूर विभागातील वैराग, अक्कलकोट तसेच बारामती विभागातील प्रधान डाकघर येथे त्यांनी विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या.

पुढे पुणे विभागातील पिंपरी कॉलनी येथे पोस्टमास्तर म्हणून त्यांनी उल्लेखनीय सेवा बजावली. पुणे येथे कार्यरत असतानाच सन २०२३ मध्ये त्यांनी PSS Group 'B' अंतर्गत अधिकाऱ्यांच्या परीक्षेत यश संपादन केले. त्यानंतर त्यांची पहिली प्रशासकीय नियुक्ती सिनिअर पोस्टमास्तर, दादर, मुंबई येथे झाली. तेथे काही काळ सेवा दिल्यानंतर त्यांची उपअधिक्षक डाकघर, नागपूर विभागात बदली झाली. विशेष म्हणजे, अहिल्यानगर डाक विभागात प्रथमच उपअधिक्षक दर्जाचे पद अपग्रेड करण्यात आले असून, या नव्या पदावर अमेय निमसुडकर यांची पहिलीच नियुक्ती झाली आहे. त्यामुळे अहिल्यानगर विभागाचे प्रथम उपअधिक्षक होण्याचा मान त्यांना मिळाला आहे. नूतन उपअधिक्षक अमेय निमसुडकर यांनी मनोगतात सांगितले की, ''प्रवर अधिक्षक डाकघर विकासजी पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने अहिल्यानगर डाक विभाग अधिक कार्यक्षम, लोकाभिमुख व प्रगत करण्याचा ठाम निर्धार आहे.



**अहिल्यानगर विभागात प्रथमच या पदावर सेवा करण्याची संधी मिळाल्याचे समाधान आहे. विभाग माझ्यासाठी पूर्णतः नवीन असून, सर्व सहकारी कर्मचाऱ्यांना सोबत घेत सक्षमपणे काम करण्याचा प्रयत्न राहील.**
**अमेय निमसुडकर,** नूतन उपअधिक्षक

या स्वागत समारंभास पोस्टल संघटनेचे महाराष्ट्र व गोवा राज्य कार्याध्यक्ष संतोष यादव, सुनिल थोरात, डॉ. राजमोहमंद शेख, संदीप कोकाटे, सोमनाथ तांबे, विनायक शिंदे, हनुमंत चव्हाण, शिवाजी लांडे, सचिन थोरवे, विशाल घुले, सागर पंचारिया, संतोष घुले, दुर्गेश शेटे, तान्हाजी सूर्यवंशी, शैलेश धोकटे, असिफ शेख यांच्यासह मोठ्या संख्येने डाक कर्मचारी उपस्थित होते.

# पिंपळगाव माळवी शाळेत बाल आनंद मेळावा साजरा



**नगर तालुका | रयत समाचार**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळगाव माळवी येथे बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी शेतातील ताजा भाजीपाला, खाद्यपदार्थ व विविध वस्तूंचे स्टॉल लावले होते. ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याने विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना मानवंदना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी दुकानदार व ग्राहक अशा भूमिका साकारत आनंद बाजारात सहभाग घेतला. यामधून पैशांचा व्यवहार, खरेदी-विक्री तसेच दैनंदिन जीवनातील आर्थिक व्यवहारांचे ज्ञान प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. याशिवाय गाणी, नृत्य व विविध मनोरंजक खेळांचा समावेश असल्याने मुलांमध्ये आनंद व उत्साह दिसून आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गंगाधर लोंढे यांनी केले. यावेळी माजी प्राचार्य शिवाजी गायकवाड, मनोज गुंड, दत्ता झिने, पुनम जाधव, प्राजक्ता वाघ, ज्योती झिने, सविता झिने, रेहाना शेख तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेतील शिक्षक अतुल वडे, सुदर्शन शिंदे, सुनील पाडळे, सतीश राठोड, मीना जाधव, मनीषा कोरडे व सुनिता पुरी यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमात सर्व विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. अशा उपक्रमांमुळे मुलांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मुख्याध्यापकांनी सांगितले. मेळाव्याने शाळेच्या वातावरणात आनंदाची उधळण झाली. कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली.



# स्त्रियांचे शिक्षण पाप मानले जात असताना सावित्रीबाईंनी शिक्षणाचा दिवा पेटवला – डॉ. प्रा. सलाम


## सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत नाट्य व वक्तृत्व कार्यक्रम संपन्न

**अहमदनगर | आबीद खान**


ज्या काळात स्त्रियांचे शिक्षण पाप मानले जात होते, त्या काळात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा दिवा पेटवला. समाजातील अन्याय, अज्ञान व अंधश्रद्धेविरोधात लढा देत त्यांनी मुलींसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले केले. शिक्षण हेच खरे परिवर्तनाचे साधन आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला, असे प्रतिपादन मोहम्मदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ. प्रा. अब्दुस सलाम यांनी केले. मोहम्मदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनींसाठी नाट्यप्रयोग व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेतून त्यांच्या शिक्षणविषयक, सामाजिक समतेच्या व स्त्री सक्षमीकरणाच्या विचारांचे प्रभावी सादरीकरण केले. वक्तृत्वातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्यातील विविध पैलू उलगडून दाखवण्यात आले. कार्यक्रमास मखदुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, मोहम्मदिया एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह डॉ. प्रा. अब्दुस सलाम, मुख्याध्यापक नौशाद सय्यद, मुख्याध्यापिका फरहाना शेख, फरीदा भाभी, हसीब शेख, असलम पटेल, शेख फरजाना दिलावर, शेख शाहिन, शेख हिना, पठाण फरहान उझमा, यास्मिन शेख, सुलताना शेख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आबीद खान यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सावित्रीबाई फुले यांचा आदर्श केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता तो प्रत्यक्ष जीवनात उतरवणे हीच खरी आदरांजली ठरेल. मुलींनी शिक्षणात पुढे जावे, आत्मविश्वासाने उभे राहावे आणि समाजाला नवी दिशा द्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यास्मिन शेख यांनी केले, तर आभारप्रदर्शन असलम पटेल यांनी मानले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनींच्या सादरीकरणाचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# गायधनींचे अद्वितीय महाकाव्य, 'योगिनींच्या स्वप्न सावल्या'

महाकवी सुधाकर गायधनी यांच्या देवदूत या महाकाव्यानंतरचे योगिनींच्या स्वप्न सावल्या हे दुसरे महाकाव्य प्रसिद्ध अनुवादक प्रा.डॉ. दत्ता सावंत आणि खुद्द गायधनी यांनी इंग्रजीत ''शॅडोज ऑफ योगिनीज ड्रीम्स'' या शीर्षकाने अनुवादित केल्यामुळे जगातील इंग्रजी वाचकांपर्यंत ते पोहचले. हा इंग्रजी अनुवाद अमेरिकेतील नॉक्टर्नीकार्न बुक्स या प्रकाशनाचे एलेक्स एस जॉनसन यांनी प्रकाशित केला असून हे महाकाव्य ॲमॅझोन.कॉम (amazon.com) वर उपलब्ध आहे. या महाकाव्याची इंग्रजी आवृत्ती बाहेर पडताच या कवितेचाही रोमानियन भाषेत जगप्रसिद्ध युरोपियन कवी आणि वर्ल्ड अकॅडमी ऑफ लेटर्सचे उपकुलपती प्रा.डॉ. लिव्हिउ पेन्डेफुण्डा यांनी रोमानियन भाषेत अनुवाद करायला सुरुवात करून पहिला खंड अलीकडेच प्रकाशित केला आहे. याबरोबरच प्रसिद्ध अमेरिकन कवी आणि समीक्षक व्लादिमीर डोलगाव्ह यांनी इंग्रजीवरून हे संपूर्ण महाकाव्य रशियन भाषेत अनुवादित करून त्यावर समीक्षात्मक लेख लिहिला असून तो लेख बेल्जियम देशातील जगप्रसिद्ध वेबझीन अॅटुनीस गॅलक्सी पोएट्री मधे प्रकाशित झाला आहे. त्याच लेखाचा हा मराठी अनुवाद. शॅडोज ऑफ योगिनीज ड्रीम्स म्हणजेच मराठीतील ''योगिनींच्या सावल्या'' ही महाकाव्य शैलीतील एक अद्वितीय काव्यरचना आहे. आधुनिक साहित्यातील ही एक अत्यंत दुर्मिळ अशी शैली आहे. तथापि, यातील आशय हजारो वर्षांपासून प्रासंगिक आहे. प्रत्येक धर्मात आत्म्याच्या मुक्तीच्या शक्यतेवर विश्वास असतो. मुक्तीचे मार्ग वेगवेगळे असतात. ही रचना योगिनींनी घेतलेल्या ब्रह्मचर्याच्या व्रताच्या स्वरूपातील असून ती यापैकी एका मार्गाचे अवलंबन करते. पण आत्म्याच्या कोणत्याही मुक्तीच्या मार्गावर अडथळे येतात. प्रत्येक अध्यायात एका वेगळ्या अडथळ्याचे वर्णन केले आहे. अगदी लैंगिक हिंसाचाराचेही. हा त्याचा एक भाग आहे. तो आजही प्रासंगिक आहे. लैंगिक हिंसाचार नाहीसा झालेला नाही. ज्याप्रमाणे पुरुष आणि स्त्रिया यांच्यातील लैंगिक फरक नाहीसा झालेला नाही. शॅडोज ऑफ योगिनीज ड्रीम ही सुधाकर गायधनी यांची इंग्रजीमध्ये वाचलेली माझी दुसरे महाकाव्य आहे. ही कविता प्राचीन संस्कृतीशी संबंधित आहे. हे रहस्य नाही की संस्कृत भाषेचे प्राचीन भाषक सध्याच्या वायव्य रशियाच्या प्रदेशात राहत होते. त्यामुळे, आई, प्रकाश, अग्नी, अंधार, वारा आणि दव यांसारखे शब्द जवळपास सारखेच रशियात उच्चारले जातात. कविता वाचताना हे खूप आकर्षक वाटते. याव्यतिरिक्त, रशियामधील अनेक नद्यांची नावे संस्कृत आहेत; गंगा, मोक्ष, पद्मा, सुरा, इंद्र, सुखोना, कामा आदि. या महाकाव्यात गायत्री मंत्राचा संदर्भ आहे.गायत्री मंत्राच्या पठणाचे खूप महत्त्व आहे. ''...सुखाचे स्वरूप; सर्वात तेजस्वी; पापांचा नाश करणारा; देवाचे स्वरूप; आपल्या अंतरात्म्यातील देव...'' कोणतेही सुख आणि कोणतेही पाप आपल्या मनात जन्म घेते. वैयक्तिक सुखाद्वारेच आपण वैयक्तिक पापाचा नाश करू शकतो! आता कोणत्याही प्रकारच्या प्रेरणांमध्ये हेच शिकवले जाते. ''तुमच्या तपश्चर्येचा मार्ग एक फसवा भ्रम आहे,''असे वाल्या हा सीमारक्षक हा या योगिनींना सांगताना समजावतो की फक्त पुढे जाण्याचा मार्ग आहे, मागे येण्याचा नाही. तिथे स्वातंत्र्य नाही, केवळ शरीरासाठीच नाही, तर त्याच्या सावलीसाठीही नाही. या कवितेत कुंडली षटचक्र या संकल्पनेची व्याख्या देखील आहे. याचा वापर आता वारंवार केला जातो. या शब्दाचा अनुवाद प्रकाशाचे चाक असाही आहे. षट-चक्र: सहा चक्रे म्हणजे शरीरातील ऊर्जेची सहा फिरणारी केंद्रे किंवा वर्तुळे. हे आता रहस्य राहिलेले नाही. सामान्य लोक आपल्या शरीराच्या हालचालींचा आनंद घेतात. पूर्ण ज्ञानाच्या




मुळाशी कुंडलिनी आहे (१२४). फिरण्यासह केलेल्या हालचाली अनावश्यक तपश्चर्येतून बाहेर पडण्यास, सामान्य ज्ञान परत मिळविण्यात मदत करू शकतात. आता कुंडलिनी ही आध्यात्मिक अभ्यासापेक्षा अधिक शारीरिक व्यायाम आहे. आणि ''जो निष्फळ वाद टाळतो, तोच शहाणा असतो,'' हा वाक्प्रचार प्रत्येक राष्ट्राच्या स्मरणात आहे. हा तो लिखित वारसा आहे जो १० व्या शतकाने आपल्याला दिला आहे. हा तो काळ होता जेव्हा रुरिक राजवंशाने पूर्व स्लाव्हिक जमातींना एकत्र करून कीवन रुसची स्थापना केली! आपल्याकडे ''ओलेग द वाईजचे गीत'' हे महाकाव्य देखील आहे. ''इगोरच्या मोहिमेची गाथा'' आहे. महाकाव्ये वाचा, त्यात असे शहाणपण आहे जे कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्यापासून हिरावून घेत आहे. जुन्या पुस्तकांमध्ये खूप मनोरंजक सुवचने आहेत: ''जो भूतकाळाच्या भुतांसोबत जगतो, त्याचे भविष्य आगीसाठी इंधन बनते.'' हे आता लागू होत नाही का? १० शतकांत माणसे बदललेली नाहीत. तांत्रिक प्रगती बदलली आहे. माणसांनी त्यांच्या हयातीत नरक निर्माण केला आहे. म्हणून, त्यांचे ''डोळे झोपेतही मिटत नाहीत. ते मुक्तीसाठी प्रार्थना करतात.'' हे आता खरे नाही का? हे १० व्या शतकातही ज्ञात होते. तसेच कवितेतील आकड्यांकडे लक्ष द्या. ते ८ चे गुणक आहेत. हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा अंक आहे. हे निसर्गाच्या घटकांशी आणि घराच्या चुलीशी संबंधित आठ दैवी प्राणी आहेत. समृद्धीची देवी अनेकदा आठ सहाय्यकांसह, अष्टलक्ष्मीच्या रूपात दर्शविली जाते, जी संपत्तीच्या आठ रूपांचे प्रतीक आहे. या पवित्र आकृतीच्या पायथ्याशी एक अष्टकोनी चिन्ह (ऑक्टाग्राम) आहे, जे सुसंवाद, विश्व आणि दैवी स्त्री शक्तीचे (शक्ती) प्रतिनिधित्व करते. वैदिक ज्योतिषशास्त्रानुसार, अंक ८ वर शनी ग्रहाचे राज्य आहे, जो न्याय, कर्म, शिस्त आणि कठोर परिश्रमातून भौतिक यश मिळवण्याचे प्रतीक आहे. अंक आठ विपुलता, शक्ती, अधिकार आणि आर्थिक यशाशी संबंधित आहे, आणि उलटा आठ (अनंततेचे चिन्ह) जीवनाच्या अंतहीन चक्राचे प्रतीक आहे. विशेष म्हणजे या महाकाव्याचे मुख्य पात्र पुरुष नाही, तर एक स्त्री आहे, आणि हीच कवितेची मुख्य कल्पना आहे जगामध्ये स्त्रियांची भूमिका. ही गोष्ट आजही प्रासंगिक आहे. ६४ तेजस्वी रूपांतील महादेवीच्या मंदिराला भेट देऊन दीक्षा घेण्याची योगिनींची इच्छा समजण्यासारखी आहे. १६ कुमारींनी ब्रह्मचर्याची शपथ घेतली आणि त्या प्रवासाला निघाल्या. तो प्रवास कठीण ठरला. हे जगाच्या स्वप्नांमध्ये आणि वास्तवातून दिसून येते. स्वप्नांची कोमलता आणि वास्तविक जगाची कठोरता, जिथे पुरुषांचे वर्चस्व आहे. हेच क्रूर पुरुष तरुण स्त्रियांच्या दुःखाचे कारण बनतात. हे पुरुष स्त्रियांच्या शपथांचा आदर करत नाहीत; त्यांच्यासाठी, लैंगिकतेची पाशवी इच्छा आध्यात्मिक सारापेक्षा अधिक बलवान आहे. यात ते जंगलातील नर प्राण्यांपेक्षा वेगळे नाहीत. पुरुष हिंसा करतात. ही हिंसा त्यांच्या धार्मिक सिद्धांतांनी झाकली जाते. काही चांगले पुरुष हे समजतात की स्वर्गात मुक्ती मिळते, ही केवळ धर्माची एक रोमँटिक कल्पना आहे. पण प्रत्यक्षात, स्वर्ग इथेच, पृथ्वीवर आहे. तो जवळच आहे. तो कुटुंबाच्या कल्याणात आहे, एखाद्या अमूर्त लैंगिक धार्मिक प्रेरणेत नाही. ही कविता हा प्रश्न उपस्थित करते की, स्त्रीला पुरुषाला संतुष्ट करण्यासाठीच का जन्माला आलेली मानले जाते? ती त्यांच्या समान बरोबरीची नाही का? हे काहीसे विडंबनात्मकपणे म्हटले आहे की पुरुषासाठी आपले नग्नत्व अंतर्वस्त्रांनी झाकणे पुरेसे का असते, तर स्त्रीला आपले संपूर्ण शरीर झाकण्याची गरज आणि सक्ती का असते? भारतीय धर्मात अनेक देव आहेत; कवितेत, ६४ स्त्री देवता महाकालीच्या दिव्य शक्तीची रूपे आहेतपार्वती जी भगवान शंकराची पत्नी आहे. जर इंद्रासारखे देव लैंगिकतेत अतिरेक करू शकत असतील, तर स्रीयांच्या लैंगिक आणि नग्न तपस्येची साधना चुकीची आहे. ही कविता सौंदर्यासह रूपकांनी परिपूर्ण अशी आहे. कवितेची लेखनशैली कोणाच्या भावना दुखावत नाही, तर त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करते. योगिनींची प्रमुख अर्थात नेत्री, तिच्या सर्व दृढनिश्चय आणि धार्मिक ज्ञानानंतरही, अयशस्वी का ठरते? हा प्रश्न वाचकांसाठीही आहे. ही कविता आजच्या संदर्भात हळूवारपणे वाचून त्यावर चिंतन करण्यासारखी आहे. ही कविता नेमकी आपल्यासाठीच लिहिली आहे. आपण सर्वजण मोहांना आणि धार्मिक सिद्धांतांना बळी पडतो. लैंगिक संबंधांदरम्यान आपण सर्वजण गहन भावना अनुभवतो. या भावनांनी उन्नत केले पाहिजे, दुखावता कामा नये.



व्लादिमीर डोलगाव्ह
अमेरिका

काव्यसंवाद